| MHKO110010932010 | **नियमित दिवाणी दावा क्रमांक १८८/२०१० मधील निशाणी क्र. ८६ वरील आदेश** **( श्रीमती शालन श्रीपती मेथे –पाटील विरुध्द शामराव पांडूरंग मेथे–पाटील वगैरे )** |
|---|---|

वादीतर्फे वटमुखत्यार यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्रमांक १ श्री .शामराव पांडुरंग मेथे यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होणेसाठी व विलंब माफ होऊन मिळणेकरीता तसेच वारस अभिलेखावर घेणेकामी दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्रमांक ०१ श्री.शामराव पांडूरंग मेथे–पाटील हे दिनांक १७.०४.२०१९ रोजी मयत झालेले आहेत . प्रस्तुत वारस अभिलेखावर घेणेकामी २ वर्ष ६ महीने २८ दिवसांचा विलंब झालेला आहे . तथापि प्रस्तुत कालावधीमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव असले कारणाने वादी हे न्यायालयात हजर राहू शकले नाहीत . वादी हे सांगली जिल्हयाचे हददीत राहत असलेने तसेच त्यांना प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेणेबाबत ज्ञान नव्हते. उपरोक्त कारणांमुळे मयत प्रतिवादी क्रमांक १ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर घेता आले नाहीत . सबब, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन मयत प्रतिवादी यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेणेकरीता झालेला विलंब माफ करुन, अबेटमेंटचा आदेश रदद करणेची तसेच वारस अभिलेखावर घेणेची विनंती केलेली आहे.

३. तदनंतर मयत प्रतिवादी यांचे कायदेशीर प्रतिनिधींना नोटीस बजावनूदेखिल त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही . सबब, प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या

म्हणण्याशिवाय चालविणेत आला. याउपर उर्वरीत प्रतिवादी यांनी अर्जाच्या पाठीमागील बाजूस त्यांचे म्हणणे देऊन अर्जातील कथनांचा इन्कार केलेला आहे. प्रतिवादींच्या मते अर्जामध्ये नमूद केलेले कारण हे खोटे व मोघम स्वरुपाचे आहे . त्याबाबत सविस्तर तपशिल नमूद नाही. तसेच वादी यांना झालेला विलंब हा दिर्घकालीन नसून त्याबाबत नमूद केलेले कारण हे काल्पनिक आहे. तसेच वादी यांनी विलंब माफीकरीता, अबेटमेंट रदद करणेकरीता व वारस अभिलेखावर घेणेकरीता एकत्रीतरीत्या अर्ज दिलेला आहे . सबब या कारणानेदेखिल वादीचा अर्ज फेटाळणेस पात्र आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे. याउलट अर्ज मंजूर करणेचा झाल्यास वादी यांना रक्कम रुपये ५०००/– चे दंड करणेची विनंती केली आहे.

४. वादी यांच्या अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द वाटपासाठी दाखल केलेला आहे . दाव्याचे स्वरुप पाहता सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्रमांक १ शामराव यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे गरजेचे आहे . त्याकरीता प्रतिवादी क्रमांक १ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश व त्याकरीता झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्रमांक १ यांचे कायेदशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेतलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही . उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. कायदयातील तरतूदीप्रमाणे वादी यांनी स्वतंत्र अर्ज देणे आवश्यक होते. परंतू केवळ त्या तांत्रीक बाबीवर सदरचा अर्ज फेटाळणे न्यायोचित

होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य व न्यायोचित होईल . सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आ दे श –**

**१.** वादी यांचा(निशाणी क्रमांक ८६) वरील अर्ज प्रतिवादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ५००/–(रक्कम रुपये पाचशे फक्त) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२.** मयत प्रतिवादी क्रमांक १ शामराव पांडूरंग मेथे–पाटील यांचे विरोधात झालेला अबेटमेंटचा आदेश रदद करणेत येत आहे.

**३.** वादी यांना मयत प्रतिवादी क्रमांक १ शामराव पांडूरंग मेथे–पाटील यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

**४.** वादी यांनी अर्जात नमुद प्रतिवादी क्रमांक १ यांचे वारसाबाबत दाव्यात दुरुस्ती प्रस्तुत आदेशापासून १४ दिवसांचे आत करावी व वादपत्राची दुरुस्त प्रत दाखल करावी.

Sd/–

ठिकाण – पेठवडगांव

दिनांक – २३.११.२०२३

( एस.डी.शिरसाट )

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.

पेठवडगांव